


पॅस्टर टोनी अलामो — द अलामो ख्रिश्चन नेशन — खंड *17400*

# परमेश्वराचे लष्कर आणि हवाई दल

## (पाहरेकरी)

**लेखक टोनी अलामो**

त्या दिवशी प्रेषित एलीशाचा सेवक पहाटे लवकर उठला होता आणि त्याने बघितले की ज्या नगरात तो आणि एलीशा मुक्काम करीत होते त्याला सिरियन सैन्याने चौहोबाजूने घेरले होते. घाबरून, तो एलीशाला म्हणाला, “स्वामी! आता आपण काय करायचे? [दुसऱ्या शब्दांत, आपण ह्या संकटातून कसे जिवंत बाहेर पडू शकू?] मग एलीशाने आपल्या नोकराला सांगितले,] भिऊ नको: कारण आपल्याजवळ जे (बळ) आहे ते त्यांच्यापेक्षा जास्त आहे. एलीशाने [परमेश्वराजवळ] प्रार्थना केली, परमेश्वरा, मी तुझी प्रार्थना करतो, कृपया त्याचे डोळे उघड म्हणजे त्याला नीट दिसेल.



*पॅस्टर टोनी आणि सुसान अलामो यांचे आंतरराष्ट्रीय टेलिव्हीजन कार्यक्रमच्या वेळी १९७३ मध्ये घेतलेले फोटो*

मग परमेश्वराने त्या तरूणाचे डोळे उघडले, त्याने पाहिले: आणि, तो बघतो तर काय, डोंगरावर सर्वत्र घोडे होते आणि एलीशाच्या सभोवती आगीने भडकलेले रथ होते “(२ राजे ६ : १५ -१७ ).

ज्या सैन्याला किंवा ज्या परमेश्वराच्या यजमानाला आपल्या सेवकाला दाखविण्याची ईश्वराला एलीशाने विनंती केली होती हे तेच सैन्य किंवा देवाचे यजमान होते ज्यांनी यरीहोच्या भिंती उध्वस्त केल्या होत्या (यहोशवा ६ :२० ). या प्रकारे यहोशवा यरीहो येथे परमेश्वराच्या सैन्याच्या सेनापतीला भेटले: “आणि असे झाले की, यहोशवा यरीहो शहराजवळ होता तेव्हा त्याने डोळे वर करून पाहिले असता त्याला त्याच्यासमोर उभा ठाकलेला एक मनुष्य दिसला. त्याच्या हातात तलवार उपसलेली होती मग यहोशवा त्याच्या जवळ गेला आणि त्याला विचारले तुम्ही आमच्या बाजूने आहात की आमच्या शत्रूच्या? आणि तो म्हणाला, नाही; फक्त परमेश्वराचा [ येशूचा पूर्व अवतार] सेनापती म्हणून मी येथे आलो आहे. आणि हे ऐकून यहोशवाने जमिनीवर डोके टेकवून त्याला अभिवादन केले आणि विचारले, माझ्या स्वामीची त्याच्या सेवकाला काय आज्ञा आहे? आणि परमेश्वराच्या सैन्याचा सेनापती यहोशवाला म्हणाला, तू तुझ्या पायातून पादत्राणे काढ कारण जेथे तू उभा आहेस ती पवित्र जागा आहे. मग यहोशवाने आपले जोडे काढले.

“ आता यरीहो पूर्णतः बंद झाला होता त्याचे कारण इस्राएलची मुले होती: त्यामुळे कुणीही बाहेर जायचे नाही आणि कुणी आत यायचे नाही.

[कारण त्यांना माहीत होते की परमेश्वर इस्राएलसोबत होता आणि त्यांना हे देखील माहित होते की परमेश्वर त्यांचा नाश करणार होता.]

आणि परमेश्वर यहोशवाला म्हणाला, ‘पाहा, तुझ्या हातात यरीहो शहरासह त्याचा राजा आणि शूर सैनिक दिले आहेत आणि तुम्ही योद्ध्यांनो, तुम्ही नगराला चौहो बाजूंनी वेढा घाला, आणि नगराभोवती एक प्रदक्षिणा घाला. असे सहा दिवस करा. [यरीहोच्या पापी लोकांना त्यांचा संपूर्ण नाश करण्यापूर्वी घाबरविण्यासाठी असे करण्यात आले.] आणि सात याजक परमेश्वराच्या पवित्र करारकोशाच्या पुढे मेंढ्यांच्या शिंगापासून तयार केलेली सात रणशिंग वाजवत जातील:

सातव्या दिवशी आपण शहराभोवती सात फेऱ्या घाला, याजक तुताऱ्या वाजवतील. आणि ते रणशिंग फुंकून दीर्घ आवाज काढतील आणि जेंव्हा तुम्हाला रणशिंगाचा आवाज ऐकू येईल तेव्हा, सर्व लोक मोठ्याने ओरडतील; आणि तसे केल्याने शहराची तटबंदीची भिंत कोसळून पडेल

[हे परमेश्वराच्या सैन्याच्या अदृश्य शक्तीद्वारे साधले जाईल] आणि लोक सरळ आत घुसतील.

“आणि नूनाचा मुलगा यहोशवा याने सर्व याजकांना बोलावले आणि त्यांना म्हणाला, हा कराराचा कोश घ्या आणि तुम्ही सात याजकांनो परमेश्वराच्या पवित्र

*(पान २ वर पुढे सुरू)*

# परमेश्वराचे लष्कर आणि हवाई दल

**(पाहरेकरी)**

*(पान १ वरून पुढे सुरू)*

करारकोशापुढे मेंढ्यांच्या शिंगाचे सात रणशिंगे घेऊन समोर चालत राहा. आणि तो लोकांना म्हणाला, निघा, आणि शहराला फेऱ्या घाला आणि ज्याच्या कडे शस्त्र आहे त्याला परमेश्वराच्या पवित्र करार कोशापुढे चालायाला द्या. आणि यहोशवाने लोकांना सांगितल्यानंतर सात रणशिंगांनी सुसज्ज सात [ज्यू] याजक परमेश्वरापुढे चालु लागले आणि तुतारी वाजवू लागले आणि त्यांच्या मागून पवित्र करार कोश येत होता. आणि सशस्त्र सैन्य तुतारी वाजवत असलेल्या याजकाच्या पुढे जात होती. आणि लोक पवित्र करारकोशामागून आले, याजक चालत होते आणि तुताऱ्या वाजवत होते. मग यहोशवाने आज्ञा दिली, 'तुम्ही ओरडू नका, अगर आपसात बोलून कोणत्याही प्रकारचा गोंगाट करू नका, तुमच्या तोंडातून एकही शब्द बाहेर निघता कामा नये, जोपर्यन्त मी तुम्हाला ओरडायला सांगत नाही तोपर्यंत ओरडू नका पण मी जेंव्हा तुम्हाला आज्ञा देईन; तेंव्हा तुम्ही ओरडा.

"मग परमेश्वराच्या पवित्र करारकोशाने शहराला प्रदक्षिणा घातली, एकदा प्रदक्षिणा घालून ते छावणीवर आले आणि छावणीमध्ये रात्र काढली. आणि यहोशवा पहाटे उठला आणि याजकांनी परमेश्वराचा पवित्र करारकोश उचलून घेतला. आणि सात रणशिंगे घेऊन सज्ज असलेले सात याजक परमेश्वराच्या पवित्र करार कोशापुढे चालू लागले आणि तुतारी वाजवू लागले: आणि सशस्त्र सैन्य याजकाच्या पुढे जात होते आणि त्यांच्या मागुन पवित्र करार कोश आणि याजक तुतारी घेवून पुढे जात होते. दुसऱ्या दिवशी सुद्धा असाच क्रम सुरु होता आणि एकदा शहराला प्रदिक्षिणा मारली आणि ते छावणीत परतले: असेच त्यांनी ओळीने सहा दिवस केले.

"आणि सातवा दिवस उजाडला आणि त्या दिवशी ते पहाटे लवकर उठले, आणि नेहमी प्रमाणे त्यांनी नगराला प्रदिक्षणा घातली, फरक एवढाच की त्या दिवशी त्यांनी त्या शहराभोवती सात प्रदक्षिणा मारल्या. सातव्या वेळी याजक तुतारी वाजवून प्रदक्षिणा घालत असतांना, यहोशवा त्या लोकांना म्हणाला, आता ओरडा; कारण परमेश्वराने तुम्हाला हे नगर दिले आहे.हे नगर शापित होईल आणि यातील सर्व वस्तु परमेश्वरामध्ये समाविष्ट होतील. सर्व काही नष्ट होईल फक्त रहाब ही वेश्या आणि तिच्या घरामध्ये असणारे लोक जगतील, कारण तिने आम्ही पाठविलेल्या हेरांना लपविले होते. तुम्ही लोकहो, तुम्ही या शापित वस्तुं पासून स्वतःला दूर ठेवा, अन्यथा तुम्ही सुद्धा शापित व्हाल. जर तुम्ही शापित वस्तु घेतली, तर इस्राएलची छावनी शापित होईल, आणि तेथील लोकांना त्रास होईल. पण सोन्याचांदीच्या तसेच तांब्या-लोखंडाच्या सर्व वस्तू परमेश्वराच्या आहेत: त्या परमेश्वराच्या भांडारात जमा केल्या पहिजेत. जमा"याजकांनी रणशिंगे वाजवली तेव्हा लोकांनी ती ऐकून मोठ्याने जयघोष केला: आणि लोकांनी तुताऱ्यांचा आवाज ऐकला आणि मोठ्याने जयघोष केला तेव्हा तटबंदी कोसळली [ईश्वराचा यजमान आणि इश्वराच्या यजमानाचा कप्तान यांनी हे साध्य केले], आणि इस्राएल लोक सरळ नगरात घुसले. त्यांनी नगराचा पाडाव केला." (जोशुआ :५:१३-६:२०)

हनोखाच्या पुस्तकात, महान संदेष्टा हनोख याने पहारेकऱ्यांबद्दल भाकीत केले आहे. हे पहारेकरी ईश्वराचे देवदूत आहेत, आणि परमेश्वराचे स्वर्गीय यजमान आहेत. त्यांच्याबद्दल कधी कधी असे सांगितले जाते की ते परमेश्वराचे पृथ्वीवरील असलेल्या पवित्र लोकांचे पालक देवदूत आहेत.

देवदूतांमध्ये वाईट देवदूत आणि चांगले देवदूत सुद्धा आहेत. प्रकटीकरण १२ : ४ मध्ये संगितल्याप्रमाणे या देवदूतांपैकी एक तृतीयांश देवदूत-वाईट देवदूत असून त्यांचा नेता सैतान आहे ज्याच्यासोबत त्यांना स्वर्गाच्या बाहेर हाकलून दिले होते.(लूक १० :१८ ). पण लक्षात ठेवा, दोन तृतियांश चांगले देवदूत देवाच्या सेवेत आहेत. एक तृतीयांश वाईट देवदूत, फक्त वाईटच नसून ते अतिशय वाईट आहेत.

प्रकटीकरण १२ : ३ मध्ये सांगीतल्याप्रमाणे, "मग स्वर्गात दुसरा चमत्कार दिसू लागला; आणि एक भलामोठा लाल ड्रॅगन [राक्षस] ज्याला सात डोकी होती ... "सात डोकी म्हणजे सात पर्वत [रोम, इटलीचे ] आहेत ज्यावर एक स्त्री बसलेली आहे "(प्रकटीकरण १७ : ९ ). ही बाई खोटी संदेष्टि, खोटे चर्च आहे, संप्रदाय आहे, व्हॅटिकन नावाच्या पशुची प्रमुख, रोमन कॅथलिक, समलिंगी, मुलांचा विनयभंग करणारी चर्च आहे. प्रकटीकरण १२ : ३ मध्ये पुढे असे सांगण्यात आले आहे की या सात डोक्यांना दहा शिंगे आहे. ही दहा शिंगे दहा युरोपियन देशांचे प्रतिक आहेत जे अल्प कालावधीसाठी रोमच्या व्हॅटिकन (यूएन, न्यू वर्ल्ड ऑर्डर) ला शक्ती देतात (अलिकडेचा देश ग्रीस आहे) ह्या देशांनी सैतानाच्या न्यु वल्ड ऑर्डसोबत, किंवा एक –जगत शासनासोबत युती केली आहे." . . . आणि त्याच्या डोक्यावरील सात मुकुट [हे सात मुकुट सैतानाच्या न्यु वल्ड ऑर्डरचे प्रतिनिधित्व करतात सात खंडावर, दुसऱ्या शब्दांत, संपूर्ण जगावर तात्पुरते राज्य करतात.]." १

"आणि त्याच्या शेपटाने स्वर्गातून एक तृतीयांश तारे काढले [तारे हे दुष्ट दूत आहेत.२ प्रकटीकरण १:२० च्या नुसार तारे देवदुताचे प्रतिक आहेत],

आणि [ड्रॅगन, सैतान] ने [एक तृतीयांश दुष्ट आणि दूष्ट दूत] यांना पृथ्वीवर टाकले: आणि ड्रॅगन [राक्षस) त्या स्त्री समोर उभा राहिला [जिच्या मुकुटामध्ये १२ तारे आहेत]. ही (स्त्री) ख्रिस्ताची वधू आहे, न्यू यरुशलेम आहे, जे पृथ्वीवरील ख्रिस्ताचे शब्दशः शरीर आहे, खरे इस्राएल आहे, जे खरे ख्रिस्ती आहेत, जे कधीही कॅथलिक नव्हते, ज्यांचा ईश्वराच्या निवडलेल्या लोकंसोबत, ज्युंसोबत उदय झाला. जे राष्ट्र ख्रिस्ताला त्यांचा मोक्ष म्हणून स्वीकारतील त्या सर्व राष्ट्रांच्या लोकांसाठी आता ईश्वराने मोक्षाची द्वारे उघडली आहेत]" (प्रकटीकरण १२ : ४ ).

प्रकटीकरण १२.४ सांगते की ही स्त्री (ख्रिस्ताचे शरीर) तिच्या मुलाला, जो ख्रिस्त होता, जन्म देण्यास तयार होती. ही त्या काळाची गोष्ट आहे जेंव्हा सैतान राजा हेरोद व त्याच्या सैन्याच्या माध्यमातून, ख्रिस्ताला त्याच्या जन्माच्या वेळी आणि / किंवा पुढील दोन वर्षापर्यंत त्याची हत्या करण्यासाठी तो इस्राएल समोर उभा होता३. कारण ख्रिस्त काल आणि आजही राजांचा राजा आणि स्वामींचा स्वामी, या जगाचा तारणहार आहे, जे त्याला त्यांचा तारणहार आणि आधिकारी म्हणून स्वीकारतील त्यांच्या आत्म्यांना वाचवून तो सैतानाचे कार्य नष्ट करेल.४ कोलोसियन्स २ :१५ मध्ये विशद केल्याप्रमाणे ख्रिस्ताने या ब्रम्हांडातील सत्ताधीशांना आणि शक्तींना आव्हान देवून आणि त्यांना हरवून त्यांचे उघडपणे प्रदर्शन केले. "

हे शेवटचे दिवस आहेत. ५ पृथ्वी परमेश्वराच्या सैन्याने भरली आहे, आणि आकाश परमेश्वराच्या हवाई दलाने भरले आहे. हे युएफओ आहेत ज्यांना संपूर्ण जगभरातील लाखो लोकांनी पाहिले आहे.या जगातील लोक परमेश्वराचे वचन (बायबल) बद्दल अज्ञानी असल्यामुळे, ते या उडणाऱ्या वस्तूंना इतर ग्रहांपासून आलेले एलियन आहेत असे समजतात. जेंव्हा आपणास बायबल, समजते, तेव्हा या जगातील लोक कसे फसवले गेले आहेत ते आपणास कळते, कारण या "उडत्या तबकड्या", ज्यांना सामान्यतः युएफओ म्हणतात, ते इतर ग्रहांवरून आलेले नाहीत. ते "पहारेकरी"

---

३ मत्तय. २:१-१८ २ इसा. १४:१२-१७, मत्तय. २५:४१, ल्यूक १०:१८, २ पेट. २:४, ज्यूड ६, रेव. १२:३-४, ७-९ १ डॅन. २:४०, ७:१९-२५, रेव. १३:२-८, १४:८, चैप. १७, १८:२-२४
६ जोएल २:२८-३२ ५ मत्तय. चैप. २४ ४ डान. ७:१३-१४, १ टीम. ६:१४-१६, हेब. २:१४-१५, १ जॉन ३:८, ४:१४-१५, रेव. १७:१४, १९:१६

परमेश्वराचे देवदूत आहेत, ख्रिस्त पृथ्वीवर पुन्हा परत येण्याच्या अगदी अगोदर ते पृथ्वीचे सर्वेक्षण करीत आहेत. हे पहारेकरी निवाड्यासाठी सज्ज होत आहेत.

प्रकटीकरण १६:१ सांगते, “मग मी त्या मंदिरातून एक मोठा आवाज ऐकला जेथे सात देवदूतांना उद्बोधन केले जात होते, तुम्ही आपल्या मार्गाने जा, आणि पृथ्वीवर देवाच्या रागाच्या सात वाट्या ओता.” दानीएल ४ :१३ मध्ये विशद केल्याप्रमाणे , “ एक पहारेकरी [एक देवदूत] आणि पवित्र व्यक्ति स्वर्गातून खाली आला” आणि त्याने गर्विष्ठ राजा नबुखद्रेस्सरवर परमेश्वराचे निवाडा आणला, हाच तो गर्विष्ट राजा जो दानीएल ४ :३० मध्ये म्हणतो की “हे तेच महान बॅबिलॉन नव्हे का जे मी राज्याच्या घरासाठी [देवाच्या सामर्थ्याऐवजी] माझ्या शक्तिसामर्थ्याने आणि [ देवाच्या सन्मानाऐवजी] माझ्या महानतेच्या सन्मानार्थ बांधलेले आहे?”

परमेश्वराने पहारेकऱ्याला राजा नबुखद्रेस्सरच्या विरुद्ध ज्या निवाड्याची अंमलबजावणी करण्यासाठी सांगितले आहे ते असे: “त्याचे शब्द [अजूनही] [गर्विष्ठ] राजाच्या तोंडातच होते की आकाशवाणी झाली, हे राजा नबुखद्रेस्सर, हे तुला उद्देशून सांगितलेले आहे; तुझे राज्य तुझ्यापासून दूर झाले आहे. आणि ते [पहारेकरी] तुला तुझ्या लोकांपासून दूर हाकलतील आणि तू वन्य पशूंबरोबर वास्तव्य करशील:

ते तुला गुरांप्रमाणे गवत खायला भाग पाडतील आणि आणि तुला धडा शिकायला सात पावसाळे (सात वर्षे) जावे लागतील. मग तुला समजून चुकेल की परात्पर देवाचेच माणसांच्या राज्यांवर प्रभत्व असते व तो त्याच्या इच्छेनुसार त्या त्या लोकांवर कृपा करित असतो. त्याच क्षणी आकाशवाणीने सांगितल्याप्रमाणे नबुखद्रेस्सरला लोकांपासून दूर हाकलल्या गेले, आणि गुरांप्रमाणे त्याला गवत खावे लागले, त्याचे शरीर आकाशातील दवाने ओले झाले होते, केस गरुडाच्या पंखासारखे, त्याची नखे पक्षांच्या नख्यांसारखी झाली होती (दानीएल ४ : ३१ -३३).

यिर्मया ४ :१६ मध्ये परमेश्वर यिर्मयाला सांगतो, “तुम्ही ही बाब राष्ट्रांना सांगा; पाहा, यरुशलेमच्या लोकांत ही बातमी पसरवा की पहारेकरी दुरवरच्या देशातून येतात, आणि यहूदाच्या शहरांच्या विरुद्ध बोलतात.” यहूदाच्या शहरांविरुद्ध जास्त राग आहे. कारण ते आज देखील येशूला त्यांचा मसीहा म्हणून स्वीकारायला तयार नाहीत आणि ते त्याला आजपर्यंत नाकारत आहेत.

माझा विश्वास आहे की या जगात असलेला जवळजवळ प्रत्येक व्यक्ति UFOs (अज्ञात उडणाऱ्या वस्तूं)चे दर्शन होण्याच्या लाखो घटानांशी परिचित आहे, परंतु ते UFOs नाहीत. ते परमेश्वराचे पहारेकरी किंवा देवदूत आहेत, जे अगदी परमेश्वराच्या निवाड्यापूर्वी, जगाच्या अंतापूर्वी, काळ संपण्यापूर्वी जगाच्या शेवटच्या काही दिवसात पृथ्वीचे सर्वेक्षण करीत आहेत. हा करुणामयी परमेश्वर (पृथ्वीच्या) विनाशाच्या अगदीपूर्वी , प्रत्येकाला शेवटच्या वेळेच्या शेकडो भविष्यवाण्या, चिन्हे आणि चमत्कार, जसे त्यांच्या तथाकथित उडणाऱ्या बश्यांमध्ये बसून पृथ्वीचे सर्वेक्षण करणारे पहारेकरी, ईश्वराचे देवदूत, हे सर्व पहारेकरी पाहण्यासाठी सर्वांना परवानगी देत आहे. जोएलचे पुस्तक याबद्दल भविष्य वर्तविते, [६]जसे प्रेषितांची कृत्ये या पुस्तकात अपॉस्टल पीटर सांगतात: परमेश्वर म्हणतो “आणि शेवटच्या दिवसात असे घडेल की, मी माझ्या आत्म्याचा सर्व मानवजातीवर वर्षाव करीन: आणि तुमची मुले आणि तुमच्या कन्या भाकीत करतील, तुमच्या तरुणांना दृष्टांत होईल, आणि तुमच्या वृद्धांना विशेष स्वप्ने पडतील: त्यावेळी मी माझा आत्मा माझ्या सेवकांवर, आणि दासींवर ओतीन ; आणि ते भाकीत करतील: आणि मी वर आकाशात चमत्कार दाखवीन आणि खाली पृथ्वीवर चिन्हे दाखवीन; सर्वत्र रक्त, अग्नि आणि दाट धूर पसरेल: परमेश्वराचा महान आणि गौरवी दिवस येण्यापूर्वी सूर्य अंधारामध्ये बदलला जाईल आणि चंद्र रक्तासारखा होईल: आणि असे होईल की, जे जे लोक परमेश्वराचे नाव घेतील व त्याची प्रार्थना करतील त्या सर्वांचे रक्षण होईल “(प्रेषितांची कृत्ये २ : १७ -२१).

पहारेकरी, म्हणजेच स्वर्गातील देवदूत, आणि आपण लोक जे ख्रिस्ती आहोत (कथोलिक्स नव्हे), आपला संबंध आहे कारण आम्हा दोघांनाही परमेश्वराने निर्माण केले आहे.परमेश्वराने देवदूत निर्माण केले, आणि परमेश्वराने आपल्याला सुद्धा निर्माण केले आहे. या जगात चांगली माणसं आहेत, आणि वाईट माणसं सुद्धा आहेत, कारण आपल्यापैकी फार कमी लोक परमेश्वराची आज्ञा पाळतात.[७]प्रथम जॉन २:३-४ : “आणि याद्वारे आपल्याला माहित होईल जर आपण त्याची आज्ञावचने पाळली तर समजावे की आपण त्याला जाणतो,” जी व्यक्ती असे म्हणते की मी परमेश्वर जाणतो आणि त्याची आज्ञावचने पाळत नाही, अशी व्यक्ति लबाड आहे, आणि तिच्या बोलण्यामध्ये मध्ये सत्य नाही”

काही लोक फुशारकी मारतात की ते परमेश्वरावर प्रेम करतात. तथापि, त्यांच्या दैनंदिन जीवनात, ते देवाच्या हाकेला उत्तर देत नाही, उलट त्याच्या हाकेकडे दुर्लक्ष करतात. काही लोक म्हणतात की जेंव्हा ते भावनावेगाने उत्सुक असतात फक्त तेंव्हाच ते परमेश्वरावर प्रेम करतात. उदाहरणार्थ, जेंव्हा त्यांना सिनेमा पाहाण्याची, किंवा दूरदर्शन कार्यक्रम पाहाण्याची, क्रीडा सामना, किंवा संगीत मैफिल पाहण्याची इच्छा होते तेव्हा, त्यांचे अंतर्मन त्यांना जाण्यापासून रोखते, पण तरीही ते जातात. त्यांना कळत असते की त्यांनी कोणतेही मोठे पाप करू नये, पण ते त्या गौण गोष्टी समजून त्यांचा विचार करीत नाहीत. सेवा प्रार्थना करताना, ते अगदी निक्षून सांगतात की त्यांना परमेश्वराच्या चैतन्याने स्पर्श केला आहे. या प्रकारे स्वतःला ख्रिस्ती म्हणवणारे अनेक जण आहेत. वास्तविक पहाता, परमेश्वरावर या प्रकारे प्रेम करणे निरर्थक आहे[८].

एखादी विशिष्ट भगिनी परमेश्वराबद्दल इतकी उत्कंठित असू शकते की दहा भावांची एकत्रित उत्कंठा देखील तिच्या परमेश्वराप्रती

*(पान ४ वर पुढे सुरू)*

७ मत्तय . ७ :१३ -१४ , २१ -२३ , ल्यूक १३ :२३ -३० ८ मत्तय . ७ :२१ -२३ , चैप . २५

## आमच्या २४-तास प्रार्थना आणि माहिती लाईनपासून

प्रिय धर्मोपदेशक टोनी अलामो,

धर्मोपदेशक विल्हेल्मिना थॉमसला (लॉडरडल लेक मध्ये, फ्लोरिडा) तिचा पॅकेज मिळाला. बायबल अभ्यास गटातील सर्व स्त्रियांनी बसून “देवाचे लष्कर आणि हवाई दल” वाचले. त्या म्हणाल्या की त्यांनी या साहित्यापासून जे काही शिकले ते एवढ्या वर्षापासून सर्व धर्मोपदेशकांचे प्रवचन ऐकून सुद्धा शिकले नव्हते (बऱ्याच काळापासून त्यांनी त्यांचे प्रवचन ऐकले नाही). त्या सर्वांनी साहित्याचा आनंद घेतला आणि आता ते सीडी ऐकत आहेत. त्या म्हणाल्या टोनी सारखे कोणीही विश्लेषण करू शकत नाही. त्या म्हणाल्या की कृपया सीडी आणि साहित्य पाठवत रहा. त्यांनी आम्हाला कळवले की ते एकत्र येवून प्रार्थना करतात, आणि ते टोनी आणि त्याच्या चर्चसाठी प्रार्थना करीत आहेत. त्यांनी पुन्हा साहित्य आणि सीडीबद्दल नवीनतम माहिती कळवत रहाण्याची विनंती केली आहे. तिने तिच्या तीन स्वच्छंदी नातवंडांना, ज्यांना अनेक वर्षे उपदेश करण्यात आला आहे, येशूच्या मार्गावर परत आणण्यासाठी चर्चने प्रार्थना करावी अशी विनंती केली आहे.

# परमेश्वराचे लष्कर आणि हवाई दल

**(पाहरेकरी)**

*(पान ३ वरून पुढे सुरू)*

असलेल्या उत्कंठे पेक्षा कमी पडेल. जेंव्हा ती परमेश्वरावर प्रेम करण्याबद्दल बोलते तेव्हा श्रोत्यांच्या डोळयात अश्रु येतात. तरी आश्चर्यकारकपणे, अशी बहीण जेंव्हा रागवते तेव्हा कोणीही तिचा राग आवरू शकत नाही. नैसर्गिक जीवन काल्पनिक जीवन (असे जीवन जे ईश्वरीय नाही आहे. एके दिवशी, जे सर्व काही नैसर्गिक जीवनाशी निगडीत आहे ते सर्व संपुष्टात यायला हवे. आपला उत्साह, आपला खोटा किंवा बनावटी आवेश, परमेश्वराबाबतचे आपले बनावटी प्रेम, आणि परमेश्वराप्रति खोटी सेवा हे सर्व नैसर्गिक आणि दैवी घटक नसलेले आणि असत्य आहे हे स्पष्टपणे दिसण्यासाठी आपल्याला ईश्वराचा स्पर्श होणे गरजेचे आहे.

आपल्याकडे स्टीलच्या आणि पितळाच्या भींतीचे कितीही थर असू देत, बाहेरचे प्रवेशद्वार असो वा नसो, मध्यभागी असलेले द्वार असो वा नसो किंवा आंतरिक द्वार असो किंवा नसो, हे सर्व एक एक करून आतील चैतन्यानुसार परमेश्वराकडे उघडणे आवश्यक आहे. त्यानंतर आपल्या लक्षात येईल की आपल्या उत्साह आणि उमेद व्यक्त करण्यात आपण प्रत्यक्ष परमेश्वरालाच पाहू शकत नाही . योहान १५. २ मध्ये नमूद केल्या प्रमाणे, जेंव्हा परमेश्वर आपणाला एवढ्या प्रमाणात प्रेरित किंवा स्पर्श करतो की त्याची आपल्या अंतरंगातून प्रमाणिकपणे सुटका होवू शकेल तेंव्हाच आपणाला पुष्कळ फळं मिळतील. जीवनाच्या अंतरंगातूनच झाडावर फळं येतात.

ज्या लोकांचा संबंध दुष्ट दूतांशी आहे ती वाईट माणसं आहेत. पण लक्षात घ्या, दुष्ट दूतां पेक्षा दैवी देवदूतांची संख्या अधिक आहेत. जेंव्हा सीरियन सैन्यांनी त्यांना घेरले होते, तेंव्हा एलीशाने हे आपल्या सेवकाला दाखविले. एलीशाने ईश्वराला त्याच्या सेवकाचे डोळे उघडण्यासाठी विनंती केली जेणेकरून तो पाहू शकेल की त्याच्या आणि एलीशा सोबत असणारे दूत हे सीरियन सैन्यांसोबत असलेल्या दुतांपेक्षा जास्त आहेत. आगीने धगधगत असेलेल्या रथांनी [परमेश्वराचा यजमान] एलीशा [आणि त्याचा सेवका] भोवती वेढा घातला होता" ज्या प्रमाणे परमेश्वराच्या राज्याचा यजमान आज पहारेकऱ्यांसोबत आहे, आपल्याला घेरून आपले संरक्षण करीत आहे, इथे पृथ्वीवर प्रत्येकजण जे-जे काही बोलत आहे आणि करत आहे ते पाहात आहे. (२ राजे ६ :१७) . –ईश्वराच्या पहारेकऱ्यांद्वारे हे सर्व सर्वत्र घडत आहे स्वर्गामध्ये उडत्या तबकड्यांद्वारे आणि पृथ्वीवर पहारेकऱ्यांद्वारे – ईश्वराच्या सैन्याच्या आणि हवाई दलाद्वारे.[९]

आता वेळ आली आहे की या जगातील प्रत्येक व्यक्तीने त्याच्या पापांबद्दल पश्चात्ताप करावाआणि त्याच्या अंत:करणाने, आत्मा, मन, आणि सामर्थ्याने परमेश्वराची आराधना करावी जी पहिले आणि सर्वात महत्त्वाचे आज्ञावचन आहे.[१०] लवकरच पूर्वेकडील आकाश मानवाच्या पुत्राच्या चिन्हाने भरलेले असेल. या घटनेची व्याख्या करणारे अनेक श्लोक बायबलमध्ये आहेत. त्यापैकी एक मत्तयचा चोविसाव्या पाठात आहे. आणखी एक यशयाच्या पाठात आहे. आणखी एक प्रकटीकरणाचा सहावा पाठात आहे.

मत्तय २४ : ३० -५१ सांगते , "आणि मग आकाशात मनुष्याच्या पुत्राचे चिन्ह दिसून येईल: आणि तेंव्हा जगातील सर्व लोक शोक करायला लागतील आणि त्यानंतर ते मनुष्याच्या पुत्राला (येशुला) स्वर्गाच्या ढगांतून आपल्या शक्ती आणि वैभवानिशी येतांना बघतील आणि तो तुतारीचा मोठ्या आवाजासोबत त्याच्या दूतांना [परमेश्वराचा यजमान, पहारेकरी] पाठवील, आणि ते त्याच्या निवडलेल्या लोकांना चार दिशांपासून आणि आकाशाच्या एका टोकापासून ते दुसऱ्या टोकांपर्यंत एकत्र करतील.

आता अंजिराच्या झाडापासून बोध शिका, जेंव्हा अंजीराच्या फांद्या नाजूक असतात तेव्हाच त्यांना फांद्यांना पाने फुटू लागतात

व आपल्याला कळते की उन्हाळा जवळ येत आहे. तसेच तुम्ही हे सर्व बघाल तेंव्हा तुम्हाला कळेल की अंत काळ जवळ आला आहे, अगदी दारापर्यंत पोहोचला आहे.

मी तुम्हांला खरं सांगतो, या गोष्टी पूर्ण होईपर्यंत ही पिढी नाहीशी होणार नाही. स्वर्ग आणि पृथ्वी नाहीशी होतील

१० देउत . ४ :२९ , ६ :५ , १० :१२ -१३ , ११ ९ २ रॉनि. १६ :९ , जेच . १ :७ -११ , ४ :१० , ६ :१ -७ , रेव . ७ :१ -३
:१३ -१४ , १३ :३ -४ , १६ , २० , २६ :१६ , ३० :६ , जोश . २२ :५ , मत्तय. २२ :३७ -४० , मार्क १२ :२९ -३१ , ल्यूक १० :२७

## केनिया

प्रिय टोनी अलामो,

आपला सर्वश्रेष्ठ आणि शक्तिशाली प्रभु आणि तारणहार येशू ख्रिस्ताच्या नावाने नमस्कार. मला आपणाला कळवतांना आनंद होतो की आपण आम्हाला पाठवलेल्या अलामो साहित्याचे आम्ही शहरभर वितरण करित आहोत. आम्ही प्रत्येकाकडे पोहोचत आहोत, त्याचे रक्षण झालेले असो वा नसो, आणि गेल्या एक महिन्यापासून आम्ही बघितले कि १५ लोक तारले गेले आहेत आणि ते आमच्या चर्च मध्ये सहभागी झाले आहेत. या व्यतिरिक्त, आम्हाला तुम्ही पाठविलेले डिसेंबर २१ रोजीचे पॅकेज मिळाले आहे. आम्ही आपणास अधिक साहित्य आणि बायबल पाठविण्याची विनंती करून आपले आभार मानतो. परमेश्वर तुम्हाला आशीर्वाद देवो. आम्ही आमच्या धर्मोपदेशकासाठी ईश्वराकडे प्रार्थना करतो कारण आम्हाला ठाऊक आहे कि प्रार्थनेच्या माध्यमातून सर्व गोष्टी शक्य आहेत.

प्रभूच्या सेवेमध्ये आपला
धर्मोपदेशक दल्मास मुनोको

बुन्गोमा, केनिया

## पेरू

*(स्पॅनिशमधून अनुवादित)*

ईश्वर तुम्हाला आशीर्वाद देवो, टोनी अलामो मिनिस्ट्री, मला तुम्हाला सांगावसे वाटते की ईश्वराच्या गौरवासाठी, आम्ही आता एका नवीन चर्चसोबत आहोत. हे चर्च सुल्लाना येथून तीन तासाच्या अंतरावर आणि पिउराच्या जवळ सेचुरा नावाच्या जागी आहे तेथे २३ प्रौढ आणि ३३ मुले आहेत. आम्ही वैयक्तिक कामासाठी गेलो आणि आपले साहित्याचे घरो-घरी वितरण केले आणि अनेकांनी त्यांचे शिक्षण सुरु ठेवण्याची इच्छा व्यक्त केली. काल आम्ही भेटलो आणि त्या बैठकीत बरेच लोक आले. त्यांनी प्रभुला स्वीकारले आणि आता आम्ही आठवड्यातून तीन वेळा भेटणार आहोत. ईश्वराचा जयजयकार असो. प्रभू येशू लवकरच येत आहे.

ऍंड्रिस चीरोक सिल्वा
टोनी अलामो मिनिस्ट्री
सुल्लाना, पेरू



अलामो मिनिस्ट्री ऑनलाईन
www.alamoministries.com

पण माझी वचने नाहीशी होणार नाहीत ... जे नोहाच्या काळी घडले तसेच मनुष्याच्या पुत्राच्या (येशुच्या) आगमना समयी घडेल. ज्याप्रमाणे महाप्रलय येण्याच्या अगोदरच्या दिवसात लोक खाऊन पिऊन मौज मजा करित होते, लग्न करीत होते आणि (आपल्या मुलां-मुलींचे) लग्न आयोजित करित होते हे सर्व नोहा आपल्या बोटीत शिरेपर्यंत चालले

आणि प्रलय येण्यापूर्वी आणि त्यांना पुराने वाहून नेण्यापूर्वी याबद्दल कुणालाही माहिती नव्हती; तसेच मनुष्याच्या पुत्राच्या आगमनाच्या वेळी होईल ... म्हणून सतर्क रहा: कारण परमेश्वर कोणत्या घटकेस अवतरेल याबद्दल तुम्हाला माहीत नाही. आपण हे लक्षात ठेवायला हवे की चोर रात्रीच्या कोणत्या प्रहरी येणार आहे हे घरमालकास माहीत असते तर त्याने पाळत ठेवली असती, आणि त्याचे घर फोडले गेले नसते. म्हणून तुम्ही देखील तयार असले पाहिजे कारण तुम्ही कधी विचारही केला नसेल त्या समयी मनुष्याचा पुत्र येईल. मग विश्वासू आणि सुज्ञ सेवक कोण आहे, ज्याला त्याच्या स्वामीने त्याच्या घराचा राज्यकर्ता नेमले आहे, योग्य हंगामाध्ये त्यांना मांस देण्यासाठी? असा सेवक खरोखर महान आहे जो त्याच्या मालकाला घरी आल्यावर त्याच्यावर सोपविलेली जवाबदारी पार पाडतांना आढळेल. म्हणून मी तुम्हांला खरं सांगतो: अशा सेवकाची घरमालक आपल्या सर्व मालमत्तेची देखरेख करण्यासाठी नेमणूक करेल. पण जर त्या सेवकात वाईट विचार येत असेल आणि त्याने मनात म्हटले असेल की माझा मालक येण्यास फार विलंब लावतो; आणि त्याचा राग म्हणून तो त्याच्या सहकारी सेवकांना मारहाण करत असेल आणि खावून आणि दारू पिऊन मस्त झाला असेल ;तर त्या घराचा मालक त्या सेवकाला आपल्या येण्याची वेळ न सांगता अशा वेळी येईल कि तो रंगे हाथ सापडेल आणि त्याला घरातून हाकलून लावेल आणि त्याला दांभिकांसोबत शिक्षा भोगावी लागेल: आणि अश्या लोकांचे खुप हाल आणि अपेष्टा होतील (ते रडतील आणि स्वत:वरच दात खातील)"

प्रभु आपल्याला भरपूर चिन्हे दाखवतो, आणि जर आपण त्यांच्याकडे लक्ष दिले तर, बेसावध राहणार नाही. येथे आणखी एक साक्षात्कार आहे ज्यावर आपण आपले मन केंद्रित केले पाहिजे कारण हा साक्षात्कार आपल्याला वाटते त्यापेक्षाही लवकर प्रत्यक्षात येणार आहे. "मी स्वर्गाचे दार उघडलेले पाहिले [हा ईश्वराने दाखविलेला अंत काळाचा आणखी एक साक्षात्कार आहे], आणि तेथे एक पांढरा घोडा बघितला; त्या घोड्यावर बसलेल्याचे नाव 'विश्वासू आणि खरा' असे होते; आणि तो न्यायाने निवाडा करतो आणि न्यायाने लढाई करतो. त्याचे डोळे अग्नीच्या ज्योतीसारखे तेवत होते,

आणि त्याच्या डोक्यावर अनेक मुकुट होते; आणि त्याचे लिखित नाव होते जे त्याच्या खेरीज इतर कुणालाही माहित नव्हते. त्याने आपल्या अंगात रक्तामध्ये भिजविलेला झगा घातला होता. त्या स्वाराचे नाव "देवाचा शब्द" असे आहे.

पहारेकरीस्वच्छ आणि पांढरे शुभ्र कपडे घातलेले स्वर्गातील सैन्य पांढऱ्या घोड्यांवर बसून त्याच्या मागे येत होते [हा प्रभू आणि त्याचे यजमान, पहारेकरी आहेत ].

त्याच्या तोंडातून एक धारदार तरवार येते जिच्याने तो राष्ट्रांना नमवील, आणि लोखंडी दंडाने [देवाचे वचन] तो त्यांच्यावर सत्ता गाजवील. सर्वसमर्थ देवाच्या अतीकोपाची द्राक्षे तो द्राक्षकुंडामध्ये तुडवील. आणि त्याच्या वस्त्रावर आणि त्याच्या मांडीवर 'राजांचा राजा' आणि 'प्रभूंचा प्रभु' हे नाव लिहिलेले आहेत [हा येशू आहे आपला प्रभु.] "(प्रकटीकरण १९ : ११ -१६ ).

आपण सध्या या काळाचा अंत होण्यास उरलेल्या शेवटच्या काही मिनिटांत जगत आहोत. जगाच्या अंताची सर्व चिन्हे दिसत आहेत. एक जगत ख्रीस्त विरोधी सरकारचे राज्य सध्या चालू आहे. परमेश्वराचा वैमानिक विभाग वर्षानुवर्षापासून कार्यरत आहे, आणि करोडो लोकांनी त्यांना (उडणाऱ्या तबकडया, पहारेकरी, देवदूत, ईश्वराचे शाही हवाई दल ) पाहिले आहे. रोममधील पोप न्यू वर्ल्ड ऑर्डर किती छान आहे या बद्दल बढाई मारत आहे. हे जग त्सुनामी, भरतीच्या लाटा, भूकंप, सर्व प्रकारचे प्लेग, रोगराई, गोंधळलेले राष्ट्रे,

*(पान ८ वर पुढे सुरू)*

## स्टीव्हन वेडेल यांची साक्ष

माझे नाव स्टीव्हन वेडेल आहे. मी ऑक्टोबर २०१२ च्या अखेरीस ५९ वर्षाचा झालो. मी ७ नोव्हेंबर, १९७१ रोजी रोजी येशु ख्रिस्ताला माझा वैयक्तिक रक्षणकर्ता म्हणून स्वीकारले. त्यावेळी नुकताच एक आठवड्यापूर्वी मी १८ वर्षाचा झालो. त्यावेळी जर ख्रिस्ताने माझ्या आयुष्यात प्रवेश केला नसता तर आपण कदाचित खुप वर्षपूर्वीच माझ्या मृत्यूची बातमी वाचली असती आणि तुम्ही एका व्यक्तीच्या जीवनात ईश्वराच्या सामर्थ्य आणि क्षमतेमुळे झालेल्या परिवर्तनाबद्दलची ही साक्ष वाचू शकला नसता. मी १९७१ च्या वसंत ऋतूमध्ये हायस्कूलची परीक्षा उत्तीर्ण केल्यानंतर, मला कॉलेजमध्ये प्रवेश घेण्याची महत्वाकांक्षा नव्हती. मी एक दांभिक हिप्पी होतो. मी माझ्या काही मित्रांसोबत सॅन फ्रान्सिस्को, कॅलिफोर्नियापर्यंत कारने फिरत राहिलो, त्यानंतर, मी लोकांना विनंती करून त्यांच्या गाड़ीमध्ये बसून फ्रॅनसिस् पासुन बोल्डर, कोलोरॅडोपर्यन्त आणि नंतर पुन्हा कॅलिफोर्नियापासून लॉस एंजेल्सपर्यन्त प्रवास करायचो.

मी ज्या एका मित्रासोबत प्रवास केलेला होता त्याच्या आईचे, बेव्हरली हिल्स मध्ये एक फार मोठे आणि सुंदर घर होते. तिने तेथे राहण्यासाठी नोकरी लागेपर्यंत आणि घर मिळे पर्यंत तेथे राहण्यासाठी आम्हाला आमंत्रित केले होते. तिचे घर फार सुंदर होते; त्याघरात जलतरण तलाव होते आणि शॉपिंग (खरेदी ) करण्यासाठी आणि आम्हाला स्वयंपाक करून देण्यासाठी एक बाई देखील होती. वास्तविक पहाता सुट्टी घालविण्यासाठी ते एक आल्हाददायक ठिकाण होते. पण तेथील वास्तव्य माझ्या आयुष्यातील अत्यंत कष्टी काळ होता. मला पूर्णपणे हरवल्यासारखे आणि माझ्या आयुष्यात आशा नसल्या सारखे वाटत होते. जीवनाचा अर्थ आणि उद्देश यासंबंधी माझ्या मनातील आणि चैतन्यातील



स्टीव्हन वेडेल यांची साक्ष

अविरत गोंधळ काहीही करता जाईना. मला अडकलेल्या सारखे वाटायचे. मला अर्थपूर्ण जीवन पाहिजे होते ज्यामुळे मी इतरांना मदत करू शकलो असतो.

माझ्या आसपासच्या परीस्थितीने मी फार व्यथित झालो होतो, सर्वत्र भ्रष्टाचार, औदासीन्य, गुन्हेगारी आणि हत्याकांड बघून मी हताश झालो होतो. मला शांतमय जीवन

*(पान ६ वर पुढे सुरू)*

# स्टीव्हन वेडेल यांची साक्

*(पान ५ वरून पुढे सुरू)*
जगायचे होते आणि वाटले कॅलिफोर्नियामध्ये हिप्पी चळवळीत सामिल व्हावे जेणेकरून मी शोधत असलेल्या प्रश्नांची उत्तरे मला मिळतील. मला वाटत होते की अमली पदार्थ जसे हशीश, एलएसडी घेऊन आणि इतर विभ्रम उत्पन्न करणारे गर्द घेवून मला तीव्र इच्छा असलेले अंतर्ज्ञान मिळेल ज्याद्वारे मला माझ्या जगण्याचे कारण शोधण्यासाठी मदत होईल. मला एक नऊ-ते-पाच चाकरीबद्ध जीवन जगायचे नव्हते, शिवाय असे कुत्री आणि मांजरे असणारे घर सुद्धा नको होते ज्याच्या सभोवताली कुंपण असेल, कुठलेच भविष्य नाही. मला खरोखर जीवनाचा अर्थ जाणून घेण्याची इच्छा होती. गर्द घेतल्यामुळे माझ्या मानसिकतेवर परिणाम झाला आणि माझा समजूतदारपणा हिरावून गेला. मला वाटले मी वेडा होणार आणि त्याबद्दल शंका वाटण्याचे कारण नव्हते. पण मला असे जगणे नको होते; शिवाय माझे संगोपन सुद्धा असे झाले नव्हते.

मी माझ्या जीवनाची सुरवातीची वर्षे परदेशात घालविली. माझे वडील टोकियो, जपानमध्ये आंतरराष्ट्रीय वायएमसीएत काम करीत होते, आणि आम्ही न चुकता दर रविवारी एका नॉन-डिनॉमिनेशनल चर्चमध्ये प्रार्थनेसाठी उपस्थित राहत होतो. मला नेहमी शिकविले गेले होते कि आम्ही ख्रिस्ती आहोत, आणि नेहमी इतरांना मदत करण्यासाठी, मानवतावादी असल्याचे शिकवले गेले होते. मला माहिती होते की ख्रिसमस आणि इस्टर विशेष सण होते, पण त्यांचा सांताक्लॉज किंवा इस्टर बनीशी (ससा) काहीही संबंध नव्हता. लहान मुलांप्रमाणे माझा विश्वास होता की या जगात एक निर्माणकर्ता, ईश्वर आहे ज्याने सर्वकाही निर्माण केले आहे ज्यात माझा सुद्धा समावेश आहे. मला येशू ख्रिस्तावर रक्षणकर्ता म्हणून विश्वास ठेवायला शिकवले गेले होते आणि तरी देखील येशू ख्रिस्ताबद्दल मला काहीही माहित नव्हते. माझ्या आयुष्यात पाप न करण्याची किंवा त्याचा प्रतिकार करण्याची शक्ती उरली नव्हती. शिवाय मी जेंव्हा मागे वळून पाहतो तर मला कळते की सुरवातीला जेंव्हा मी ज्या चर्चमध्ये जात होते तेथे मला पाप काय आहे याबद्दल शिकवले गेले नव्हते. मी "आत्म्याचा पुनर्जन्म" नावाची संज्ञा कधीच ऐकली नव्हती आणि त्या कोणत्याही चर्चमध्ये अशी वेदीच्या हाकेची प्रथा जेथे आत्म्याचे रक्षण केल्या जाते ते मी बघितले नव्हते. ते माझ्या सारखेच आध्यात्मिकरीत्या मृत होते.

मी शाळेत दहावीला जात होतो तेंव्हा आमचे कुटुंब अमेरिकेला परत आलो. मला पुन्हा आध्यात्मिकरीत्या मृत व्हायचे नव्हते. माझ्या आजूबाजूच्या अनेक घडामोडी चालू होत्या काही जण अमली पदार्थांच्या आहारी जात होते. मी मात्र माझ्या अंतर्मनात विविध प्रश्न जसे जीवन, मृत्यू, अनंतकाळ, जीवनाचा उद्देश अश्यासारख्या प्रश्नांची उत्तरे शोधू लागलो होतो. मी पूर्वेकडील धर्मांवर, गूढ धर्म, मूळ अमेरिकन भारतीय धर्म, अनेक तत्वज्ञानावर, कम्युनिस्ट, समाजवाद, भांडवलशाही, लोकांच्या कल्पना आणि आदर्शांवर आणि अनेक विषयांवर पुस्तके वाचू लागलो. मी बायबल वाचायचो, पण त्या वेळी, माझ्यात ईश्वराचे चैतन्य नव्हते आणि म्हणून ते मला कळायचे नाही. मी परमेश्वराच्या सानिध्यात येण्यासाठी अनेक प्रयोग केले जसे उच्चार, योग सराव, जंगलातून चालत जाणे फुलांवर पाऊल न ठेवता जंगल वारी करणे, पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही. माझ्या जीवनातील अंतर्गत पोकळी कायमच होती. कशाचाही उपयोग होत नव्हता. त्यावेळी मला माहित नव्हते, पण आता मला कळते की प्रभू माझ्याशी असा का वागत होता आणि मला अश्या ठिकाणी आणून माझे गर्वहरण करून मला प्रभु येशूला आपला रक्षणकर्ता म्हणून स्वीकारायला लावायचे होते. ईश्वराने इतर सर्व पर्याय संपवण्याची अनुमती दिली. कदाचित ईश्वराला तुमच्याशी वागतांना याप्रकारे वागावे लागले नसेल, पण त्याला माहीत होते की मला शुद्धीवर आणण्यासाठी तोच एकमेव मार्ग होता. त्याने मला या उद्देशासाठीच कॅलिफोर्नियाला आणले होते. ईश्वराने मला सुधारण्याचे काम सुरु केले होते, पण मला ते अद्यापपर्यंत माहीती नव्हते.

हॉलिवूड, कॅलिफोर्नियाला आपण गेलात तर हॉलीवूडच्या परिसरात आपण २००पाऊल पुढे जात नाहीत तर आपल्याला कोणीतरी अशी व्यक्ती भेटेल जी तुम्हाला टोनी आणि सुसान अलामो ख्रिश्चन फाउंडेशनच्या महान कार्याबद्दल साक्ष देईल. तुम्ही त्या परीसरात जेथे जेथे जाल तेथे तेथे तुम्हाला असे लोक आढळतील. मी जेव्हा जेव्हा हॉलिवूडला गेलो, कामाच्या शोधात किंवा वेळ घालवत, तेव्हा ते मला सर्वत्र आढळायचे; गॉस्पेल पत्रिका वाटायचे आणि त्यांच्या चर्चमध्ये सेवा प्रार्थनेसाठी लोकांना आमंत्रित









अलामो मंत्रालयाचे बांधव आणि भगिनी नर्सिंग होम्समध्ये वृद्ध रहिवाशांची सेवा करीत असतांना

करायचे. ते ईश्वरासाठी उत्साहाने परिपूर्ण होते. त्यांनी मला अनेक वेळा परमेश्वराबद्दल साक्ष दिली आणि इतर लोकांप्रमाणे चर्चमध्ये येण्याचे आमंत्रण दिले, पण मी वारंवार त्यांचे आमंत्रण नाकारले. मी माझ्या स्वत: च्या विचारात एवढा मग्न होतो कि इतरांकडून येशूबद्दल ऐकण्यासाठी मी तयार नव्हतो. मात्र अनेक वेळा जेव्हा दिवसाचा संघर्ष संपायचा आणि रात्र व्हायची आणि तेव्हा मला एकांतात असताना या ख्रिस्ती लोकांनी सांगितलेल्या परमेश्वराबद्दलच्या गोष्टींची आठवण व्हायची, बायबलमध्ये सांगितलेल्या पवित्र शास्त्र, त्यात लिहिलेल्या गोष्टी, अनंतकाळचे जीवनाचे पवित्र शास्त्र, आणि नरकाबद्दलच्या गोष्टी मला आश्चर्यचकित करित असत. बाहेरून सैतान मला त्याच्याकडे ओढत होता, पण आतून परमेश्वर माझी प्रौढी छिन्नविछिन्न करित होता. एका दुपारी, ईश्वराने सुरू केलेल्या घटनांच्या मालिकेचा अंत केला. मला वाटले कि माझ्या आयुष्यात काहीतरी घडत होते पण ते खरोखर काय होते ते मला माहित नव्हते. मी पुन्हा त्यादिवशी हॉलीवूडच्या परिसरात गेलो पण चर्चच्या बंधू बहिणींना शोधण्यासाठी नव्हे तर उलट, मी त्यांना टाळण्याचा प्रयत्न करीत होतो.

योग असा घडून आला की माझी एका ईश्वराची साक्ष देणाऱ्या भगिनीशी भेट झाली. तिने मला गॉस्पेलची एक पत्रिका दिली आणि सायंकाळी चर्चमध्ये येण्याचे आमंत्रण दिले. मी वेळ मारून घेण्याच्या उद्देशाने तिला काहीतरी सांगावे म्हणून म्हणालो, “मी विचार करिन”. तिने पटकन उत्तर दिले, ती म्हणाली, “मी खरोखरच विचार केला असता कारण असे असू शकते कि ही शेवटची वेळ असेल जेंव्हा ईश्वराचा तुमच्याशी काही घेणे देणे असू शकेल”. तिच्या अश्या म्हणण्याने मी इतका प्रभावित झालो कि तिने इतर काहीही म्हटले असते तर त्याचा एवढा प्रभाव झाला नसता. नंतर स्वत: देवालाच माझ्याशी काहीही घेणे देणे नसेल या विचाराने मी व्यथित झालो. या विचाराचा माझ्यावर एवढा मोठा प्रहार झाला कि एक टन विटा जरी माझ्यावर आदळल्या असत्या तरी त्याचा एवढा मोठा आघात झाला नसता. या विचाराने मला जागच्याजागी थांबवले. मी वेडसर होतो पण एवढाही नाही कि मी ईश्वरावाचून राहू शकलो असतो. ईश्वराने मला एकटे सोडावे अशी माझी कधीही इच्छा नव्हती. यामुळे मी फार घाबरलो. मी आधीच खूप दु:खी होतो. मी हॉलीवूडच्या रस्त्याने खाली चालत गेलो आणि एका बाजूच्या रस्त्यावर आलो, तेथे अनेक मोठी घरे आणि बाजूने मोठे उघडे आवार होते. मी आवारात बसलो आणि बसच्या जाण्याची वेळ होईपर्यंत वाट पाहत होतो, आणि जेव्हा बस मधे लोक चढतांना बघितले मी बस जिथे उभी होती तेथे गेलो आणि बसच्या आत शिरलो आणि आसनस्थ झालो. सौगुस येथील चर्च पर्यंतचा प्रवास अगदी लांब होता पण तरी देखील मला घरी असल्यासारखे वाटत होते. एक ख्रिस्ती बांधव त्याच्या गिटारवर गॉस्पेलची गाणी गात होता आणि बसमधील इतर सर्व लोक त्याची साथ देत होते. हा सर्व प्रकार मला त्या वेळी फार विचित्र वाटत असला तरी मला खूप शांत वाटत होते. जेंव्हा आम्ही चर्चमध्ये पोहोचलो तेव्हा, बसने आलेल्या सर्व अतिथींना आत येण्यास आणि सेवा प्रार्थनेसाठी बसण्यास सांगितले गेले. मी याआधी अशा चर्चमध्ये कधीही गेलेलो नव्हतो. मी या आगोदर इतर चर्चमध्ये उपस्थित राहून अनुभवलेली मृत भावना या चर्चमध्ये नव्हती. सेवा प्रार्थनेच्या वेळी हे बंधू आणि बघिनी जोरजोराने गॉस्पेलची गाणी गात होते. ते आपले हात वर करून परमेश्वराची स्तुती करित होते. असे भासत होते की चर्चमध्ये त्या रात्री प्रत्येकजण त्यांच्या जीवनात ईश्वराने घडविलेल्या सकारात्मक बदलाबद्दल साक्ष देत होता. काही लोक माझ्या सारखे गर्दुले होते, काही नव्हते. काही जण तुरूंगवाऱ्या करून आलेले होते; काही लोक समाजाच्या अत्यंत खालच्या पातळीचे होते तर काही लोक उच्छृंखल होते. ते लोक माझ्यासारखेच दुखी आणि हरवलेले होते. आता त्या सर्वांनी ख्रिस्ताला त्यांच्या रक्षणकर्ता म्हणून घोषित केले. यापुढे ते हरवलेले नव्हते, तर सापडलेले होते. त्यांनी त्या रात्री सेवा प्रार्थने मध्ये जे काही सांगितले होते ते माझ्या अंतर आत्म्याला हवे होते. मला ते जीवन हवे होते, पण तरीही अनेक गोष्टींबद्दल मला खात्री नव्हती. माझे रक्षण होऊ नये म्हणून सैतान त्याच्या शेवटच्या प्रयत्नात माझ्या मनामध्ये लाखो शंका उपस्थित करीत होता.

बायबलमध्ये सांगितले आहे, “प्रभु येशूवर विश्वास ठेव आणि तुझे रक्षण होईल ” त्या रात्री जेंव्हा मी वेदीच्या हाकेच्या आमंत्रणानिमित्त गेलो, तेंव्हा मी अनुभवले कि माझ्यावरची सैतानाची पकड सैल झाली होती. मी त्या रात्री जमलेल्या भक्तांच्या समोर गुडघे टेकवून प्रभूवर विश्वास ठेवला आणि माझे रक्षण झाले ! ईश्वराचा जयजयकार असो! ईश्वराने माझ्यावर नेहमीच संयम आणि दया परमेश्वराची स्तुती असो ! माझा पुन्हा जन्म झाला होता! मला वाटले की परमेश्वर त्या रात्री माझ्या हृदयात शिरत होता आणि मी सुद्धा त्याला मला सोडून जाऊ देणार नव्हतो. सेवा प्रार्थना केल्यानंतर मी प्रार्थना कक्षात गेलो आणि मला खात्री पटली कि ईश्वर स्वर्गात राहतो आणि त्याने माझी काळजी केली होती आणि माझ्या प्रार्थनेला उत्तर दिले होते हि अत्यंत सांत्वनापूर्ण अनुभूती होती. या साठी ख्रिस्ताने स्वतःचे रक्त वाहून किंमत अदा केली. स्वतः हुतात्म्य पत्करले जेणे करून आपण जगू शकू.त्याने मला त्या रात्री अश्या ठिकाणी आणले की मी ते कधीच विसरू शकणार नाही. या नंतर सुमारे दोन आठवड्याच्या सुमारास त्याने पवित्र आत्म्याचा बाप्तिस्मा दिला. या अनुभवानंतर कुणी जर मला पटवून सांगितले असते की ईश्वर अस्तित्वात नाही तर मी त्यावर अजिबात विश्वास ठेवला नसता. ईश्वर जिवंत आहे आणि तो सदैव जिवंत राहील. ईश्वराने मला पापमुक्त केले आणि तो तुम्हाला देखील पापमुक्त करू शकतो. मी तेव्हापासून या मंत्रालया मार्फत ख्रिस्ताकडे हजारो लोक आणल्या गेलेले पाहिले आहे. अनेक लोकांना ईश्वराच्या सामर्थ्याने त्यांच्या आजार आणि व्याधीपासून बरे होतांना मी पाहिले आहे. मी बऱ्याच लोकांचे उध्वस्थ जीवन (माझ्यासारखे) पुन्हा अर्थपूर्ण होतांना बघितलेले आहे. मी माझे ख्रिस्ती जीवन या जगातील इतर कोणत्याही गोष्टीसाठी बदलणार नाही.

टोनी आणि सुसान अलामो यांच्या वापर करून परमेश्वराने ख्रिस्तामध्ये नवीन जीवन शोधण्यासाठी जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रापासून हजारो लोक आणले आहे. ते दोघेही फार नि: स्वार्थीपणे सेवा करायचे. त्यांनी त्या सेवेच्या मोबदल्यात कोणालाच काहीही मागितले नाही त्यांची फक्त एकच अपेक्षा होती की आम्ही परमेश्वराची सेवा करावी. १९८२ मध्ये सुसान नेहमीसाठी प्रभूकडे वास्तव्यास गेल्या आणि तेव्हापासून टोनी दररोज गॉस्पेल सांगत आहेत. त्यांचे कार्य अजूनही सुरु आहे. मी आणि इतर अनेक लोक त्या दोघांचे खूप ऋणी आहोत कारण त्यांच्यात ईश्वराप्रती उत्साहच नव्हता तर ते इतर गरजू लोकांच्या मदतीसाठी, त्यांना मदत पोहोचण्यासाठी देवाच्या साक्षीदारांना रस्त्यावर पाठवीत असत, शिवाय त्यांनी जागा सुद्धा दिली जेथे माझ्यासारखे अनेक लोक एक पवित्र, शुद्ध जीवन जगू शकतील आणि ह्या दुष्ट जगाच्या व्यवहाराशी काहीही घेणे देणे नसेल. ईश्वराचा जयजयकार असो! जर आपण ही साक्ष वाचत असाल आणि अद्याप पापमुक्त झालेले नसाल , तर प्रतीक्षा करू नका. येशू ख्रिस्त या जगाचा खरा तारणारा आहे, आणि तो आपणास जे जे पाहिजे असेल ते सर्वकाही देऊ शकतो. त्याने मला वाचवले, त्याने मला आनंद व्यक्त करण्यासाठी, जगण्यासाठी आणि मरण्यासाठी उद्देश दिला आहे. तो तुमच्यासाठी सुद्धा हेच करू शकतो. वाट पाहू नका. आजच त्याला आपल्या अंत: करणात प्रवेश करण्याची विनंती करा !

ईश्वराचा जयजयकार असो,
स्टीव्हन वेडेल

# परमेश्वराचे लष्कर आणि हवाई दल
### (पाहरेकरी)

*(पान ५ वरून पुढे सुरू)*

छळ आणि या प्रकारच्या शेकडो शापांनी ग्रस्त आहेत.

तुम्ही एकतर चांगले आहात किंवा वाईट[११]. तुम्हाला एकतर आपला तारणहार म्हणून ख्रिस्त प्राप्त होईल, किंवा तुम्ही त्याला नाकाराल. खुप उशीर होण्यापूर्वी आपण त्याला निवडा. आपण अनंत काळापासून केवळ एक श्वास दूर आहात, हृदयाच्या एका ठोकाच्या अंतरावर आहात .[१२] तुमच्या आत्मासाठी ही प्रार्थना म्हणा. मग पाण्यात पूर्णपणे बुडून पिता, पुत्र आणि पवित्र आत्म्या[13] च्या नावाने बाप्तिस्मा करून घ्या. राजा जेम्सचे बायबल व त्याच्या मराठी आवृत्तीचा अभ्यास करा आणि आज्ञावचनांचे पालन करा.[१४] परमेश्वराच्या शुद्ध चैतन्यात मार्गस्थ व्हा[१५]

**हे प्रभू आणि हे ईश्वरा, माझ्या आत्म्यावर, एका पाप्यावर दया कर.[१६] माझा विश्वास आहे की येशू ख्रिस्त हा जिवंत ईश्वराचा पुत्र आहे.[१७] माझा विश्वास आहे की त्याने माझी आधीची सर्व पापे माफ व्हावीत यासाठी तो सुळावर मृत्यू पावला आणि स्वत:चे मौल्यवान रक्त सांडले. [१८] माझा विश्वास आहे कि ईश्वराने पवित्र आत्म्याच्या शक्तीद्वारे येशूला मृतावस्थेतून उठवले आहे,[१९] आणि ईश्वराच्या उजव्या बाजूला बसून तो या क्षणाला माझ्या पापांचा कबुलीजबाब आणि ही प्रार्थना ऐकत आहे.[२०] हे येशू ख्रिस्ता, मी माझ्या हृदयाचे दार उघडून तुला माझ्या हृदयात येण्याचे आमंत्रण देत आहे.[२१] तु माझ्याऐवजी कॅवलरी येथे क्रुसावर जे रक्त सांडलेस त्या मौल्यवान रक्ताने माझी सर्व घाणेरडी पापे धुवून काढ. [२२] हे येशू ख्रिस्ता, तू मला दूर करणार नाहीस आणि माझ्या सर्व पापांना माफ करशील आणि माझ्या आत्म्याला वाचवशील. हे मला माहित आहे कारण तुझा शब्द म्हणजेच बायबल तसे सांगते[२३]. तुझा शब्द सांगतो की तू कोणालाही दूर लोटणार नाहीस आणि त्यामधे माझाही समावेश होतो.[२४] म्हणूनच मला माहित आहे की तू माझी प्रार्थना ऐकली आहेस मला माहित आहे की तू माझ्या हाकेला उत्तर दिले आहे आणि मला माहित आहे की तू मला वाचवले आहेस.[२५] हे येशू ख्रिस्ता, माझा आत्मा वाचवल्याबद्दल मी तुझे आभार मानतो आणि तुझी आज्ञा मानून आणि यापुढे आणखी कोणतेही पाप न करून माझी कृतज्ञता व्यक्त करतो.[२६]**

मुक्ती मिळाल्यानंतर, पिता पुत्र व पवित्र आत्म्याच्या नावाने पाण्यात पूर्णपणे बुडवून, आपण बाप्तिस्मा घ्यावयाचा आहे[२७] बायबलचा नीट सखोलपणे अभ्यास करा आणि ते जे सांगते ते करा.[२८]

प्रभूला वाटते की तुम्ही इतरांना तुमच्या मुक्तीबद्दल सांगावे. आपण धर्मोपदेशक टोनी अलामोच्या गॉस्पेल देणाऱ्या साहित्याचे वितरक होऊ शकता. आम्ही ते आपल्याला मोफत देऊ. आम्ही आपणास हे साहित्य मोफत देवु. अधिक माहितीसाठी आम्हाला कॉल करा किंवा ई-मेल करा. हा संदेश इतरांपर्यंत पोहचवा.

जर तुम्हाला येशूच्या आदेशानुसार, हे जग वाचले जावे असे आपल्याला वाटत असेल तर ईश्वराला टायथिस आणि प्रसादापासून वंचित ठेवू नका. ईश्वराने म्हटले, मनुष्य देवाला ठकवील काय? तुम्ही तर मला ठकविले आहे; असे म्हणून तुम्ही म्हणता आम्ही कोणत्या बाबतीत तुला ठकविले आहे? दशमांश (टायथिस) आणि अर्पणे यासंबंधाने. तुम्ही एका शापाने शापित झाला आहात: कारण तुम्ही आणि या पूर्ण राष्ट्राने आणि [संपूर्ण जगाने] मला लुटले आहे.सेनाधीश परमेश्वर म्हणतो, माझ्या मंदिरात अन्न असावे म्हणून सगळा दशमांश (टायथिस-तुमच्या एकूण उत्पन्नाचा दहावा हिस्सा) तुम्ही भांडारात आणा म्हणजे मी आकाशकपाटे उघडून जागा पुरणार नाही एवढा आशीर्वाद तुम्हाकरिता वर्षितो की नाही याविषयी माझी प्रतीती पाहा. तुमच्या भूमीच्या पिकाची नासाडी होऊ नये म्हणून ते खाऊन टाकणाऱ्यास मी तुम्हासाठी धमकावीन; तुमच्या बागेतील द्राक्षलतांचे फळ अकाली गळणार नाही असे सेनाधीश ईश्वर म्हणतो.” (मलाखी ३ :८ -१२ )

---

**१४** २ टीम . २ :१५ , ३ :१४ -१७ **१३** मत्तय . २८ :१९ -२० **१२** एकक्ल . ३ :१९ , इसा . २ :२२ **११** मत्तय . ७ :१५ -२० , जेम्स ३ :११ -१२, रेव . २० :११ -१५ , २१ :७ -८ , २४ -२७ , २२ :११ -१२ , १४ -१५
**१८** ऍक्ट्स **१७** मत्तय . २६ :६३ -६४ , २७ :५४ , ल्यूक १ :३० -३३ , जॉन ९ :३५ -३७ , रोम . १ :३ -४ **१५** एज़ेक . ३६ :२७ , रोम . ८ :१ -१४ , गाल . ५ :१६ -२५ **१६** प्सा . ५१ :५ , रोम . ३ :१० -१२ , २३
**१९** प्सा . १६ :९ -१० , मत्तय . २८ :५ -७ , मार्क १६ :९ , १२ , १४ , जॉन २ :१९ , २१ , १० :१७ -१८ , ११ :२५ , ऍक्ट्स २ :२४ , ३ :१५ , रोम . ८ ४ :१२ , २० :२८ , रोम . ३ :२५ , १ जॉन १ :७ , रेव . ५ :९
**२१** १ कोर . ३ :१६ , रेव . ३ :२० **२२** एफ . २ :१३ -२२ , हेब . ९ :२२ , १३ :१२ , २० -२१ , १ जॉन १ :७ , रेव . १ **२०** ल्यूक २२ :६९ , एक्ट्स २ :२५ -३६ , हेब . १० :१२ -१३ :११ , १ कोर . १५ :३ -७
**२६** जॉन ५ :१४ , ८ :११ , रोम . ६ **२५** हेब . ११ :६ **२४** मत्तय . २१ :२२ , जॉन ६ :३५ , ३७ -४० , रोम . १० :१३ **२३** मत्तय . २६ :२८ , ऍक्ट्स २ :२१ , ४ :१२ , एफ . १ :७ , कॉल. १ :१४ :५ , ७ :१४
:४ , १ कोर . १५ :१० , रेव . ७ :१४ , २२ :१४ **२७** मॅथ. २८:१८-२०, जॉन ३:५, ऍक्ट्स २:३८, १९:३-५ **२८** ड्यूश. ४:२९, १३:४, २६:१६, जोश. १:८, २२:५, २ टिम. २:१५, ३:१४-१७, जेम्स १:२२-२५, रेव. ३:१८

---


*कृपया अधिक माहितीसाठी व तुम्हाला रस वाटू शकेल अशा इतर विषयांवरील लेखनसाहित्यासाठी आमच्याशी संपर्क करा.*

**टोनी अलामो, जागतिक पॅस्टर, टोनी अलामो ख्रिश्चन मिनीस्ट्रीज वर्ल्डवाईड, पोस्ट बॉक्स २९४८ , हॉलिवूड, कॅ. ९००७८**

**प्रार्थना व माहितीकरिता २४ तास उपलब्ध: (६६१ ) २५२ -५६८६ • फॅक्स (६६१ ) २५२ -४३६२**

**www.alamoministries.com • taoffice@alamoministries.com**


*यू.एस.मधील ज्या व्यक्तीं, आपले तन, मन, हृदय, ताकद व आत्मा अर्पून ईश्वराची सेवा करतील, अशा व्यक्तींना जगभरातील, टोनी अलामो ख्रिश्चन मिनिस्ट्रिज, अशी जागा पुरवते की जिथे जगण्यासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी मिळतील*

**न्यूयॉर्क शहरांत दर मंगळवारी रात्री ८ वा. व इतर ठिकाणी प्रत्येक रात्री सेवा आयोजित करण्यात येतात.अधिक माहिती-साठी कृपया (९०८ ) ९३७ - ५७२३ या क्र.वर फोन करा.**

प्रत्येक सेवेनंतर जेवण दिले जाईल.

ख्रिश्चन पॅस्टर अलामो यांनी लिहिलेले पुस्तक “द मसीहा” मागून घ्या. यामध्ये जुन्या करारामधील ३३३ च्यावर गोष्टींतून ख्रिस्ताबाबतचा पुरावा दिला आहे.

*धर्मोपदेशक अलामो यांच्या लेखी साहित्याचे वाटप करून लोकांची आत्मोन्नती करणारे सेवक म्हणून काम करा.*

*आमचे सर्व लेखी साहित्य व ऐकण्याचे संदेश ,शिपिंग शुल्कासह, नि:शुल्क पाठवले जातात.*

*जर त्यासाठी कुणी तुमच्याकडून पैसे घेत असेल तर कृपया पुढील क्र. वर फोन करा. (६६१ ) २५२ -५६८६ कलेक्ट.*

**या लेखी साहित्याद्वारे मुक्तीसाठी खरा मार्ग कोणता हे दाखवले जाते. (प्रेषितांची कृत्ये४ :१२ ).**

**हे साहित्य फेकू नका. कृपया दुसऱ्या कोणाला तरी ते वाचायला द्या.**

**जे कोणी दुसऱ्या देशांमध्ये असतील त्यांनी कृपया हे साहित्य त्यांच्या देशांतील बोली भाषांमध्ये अनुवादित करावे.**

**जर आपण हे साहित्य पुन्हा प्रकाशित करणार असाल तर कृपया खालील कॉपीराईट व रजिस्ट्रेशनचा समावेश करा.**

© कॉपीराईट फेब्रुवारी २०१३ सर्व हक्क राखीव जागतिक धर्मोपदेशक टोनी अलामो ® फेब्रुवारी नोंदणीकृत २०१३

MARATHI—VOLUME 17400—*THE ARMY AND AIR FORCE OF GOD*